# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ४ जुलै, २०२४

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **मुख्यमंत्री** : | | लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा एकोणपन्नासावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील. |
| (२) | **उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री** : | | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) | **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : | **(क)** | मुंबई विद्यापीठ यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | **(ख)** | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा सहासष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १ )**

(१) **श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शेलपिंपळगाव मोहितेवाडी (ता.खेड, जि.पुणे) या गावाच्या हद्दीतील चाकण शिक्रापूर रस्त्यावर मोहितेवाडी येथे दिनांक १९ मे २०२४ रोजी वा त्या सुमारास पहाटे चार वाजता गॅस वाहतूक करणाऱ्या टँकरमधून अवैधरीत्या घरगुती गॅसची चोरी करताना गॅस टँकरचा स्फोट झाला असणे, या घटनेमध्ये ६ लोक मृत्यू पावून मोठी जीवितहानी झाली असणे, सदर परिसरातील १०० ते १५० मीटर अंतरावरील घरांचे नुकसान झाले असणे, खेड तालुक्यात अवैधरीत्या

घरगुती गॅस चोरीचे प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असणे, संबधित विभागाचे याकडे पूर्णपणे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे खेड तालुक्यातील सर्वच गॅस एजन्सीची तपासणी करण्याची निर्माण झालेली गरज पाहता, याबाबत शासनाकडून कठोर कारवाई करण्याबाबत सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असणे, शासनाकडून मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, शासनाच्या या कृतीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, यासाठी राज्यातील सर्वच गॅस एजन्सीची स्वतंत्र यंत्रणे मार्फत तपासणी करून नियमबाह्य गॅस एजन्सी चालकांवर कारवाई तसेच या घटनेमधील मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना व अपघातग्रस्तांना शासनाकडून मदत करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ ते ६ )**

**(२) श्री. नितेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक येथील सय्यद मुशिर मुनिरोद्धिन यांनी नाशिक गावठाण मध्ये येणारी मिळकत सिटीसर्वे क्रमांक ३८००/२ या मिळकतीवर नाशिक महानगरपालिकेची दिशाभूल करून इमारत बांधकाम व वापर करण्याबाबतचा प्लॅन मंजूर करून घेणे, सदर ६३७०.९० चौ.मी क्षेत्र हे विकास आराखड्यात मुस्लिम कब्रस्तान म्हणून दर्शवण्यात आलेले असणे, त्यानंतर नाशिक महानगरपालिकेच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी झालेल्या महासभेतील ठराव क्रमांक २३१ अन्वये सदर जागा ही स्मशानभूमी झोन ऐवजी रहिवासी झोन म्हणून मंजुरी देण्यात आलेली असणे, यासर्व प्रकरणी नगररचना अधिनियम १९६६ च्या अन्वये क्षेत्र बदल व नगररचना विभागाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसणे व परवानगी देखील घेतलेली नसल्याचे निदर्शनास येणे, तसेच मुशीर सय्यद यांनी बेकायदेशीर बांधकाम करून मजली एसएमइम्पेरियल हॉटेलचे बांधकाम करणे, बिल्डिंग प्लॅन प्रमाणे क्षेत्रफळ २५६ चौ.मी. + ३८ चौ.मी. TDR मंजूर असताना व पाच मजली रहिवासी मंजूर केलेले असतांना जास्त पटीने बांधकाम केल्याचे निदर्शनास येणे, रहिवासी परवानगी असताना लॉजिंग बोर्डिंग चा व्यवसाय करून जागेचा कमर्शियल वापर करत असणे, महानगरपालिकेच्या संबंधित तत्कालीन अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन बिल्डिंगला पूर्णत्वाचा दाखला दिलेला असणे, त्या अधिकाऱ्यांच्या प्रॉपर्टीत वाढ झालेली असणे, तसेच बाजूला असलेल्या जागेत पेट्रोलपंपची जागा आरक्षित असताना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने नियमांचे उल्लंघन करून बिल्डिंग पूर्णत्वाचा दाखला मिळवणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. विनोद निकोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यातील डहाणू नगरपरिषद हद्दीत किमान १०० वर्षे, ८० वर्षे, ६० वर्षे व ४० वर्षे जुनी घरे असणे, सदर ऐतिहासिक वारसा जतन करण्याची गरज असतानाही नगर पालिका प्रशासन या घरांना अनधिकृत बांधकाम ठरवून तोडण्याची कारवाई करत असल्याने जनतेत मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झालेली असणे, त्याचबरोबर जुनी घरे तोडू नये असे निर्देश शासनाच्या नगर विकास विभागाने दिलेले असताना देखील मुख्याधिकारी यांनी केलेली कारवाई बेकायदेशीर ठरत असणे, यास्तव येथील घर मालकांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार व शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सदर घरे न तोडता ती कायम स्वरूपी टिकवून हा ऐतिहासिक वारसा जतन करण्यात यावा अशी मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील महानगरपालिकेच्या महत्वाच्या रुग्णालयांपैकी सायन कोळीवाडा मतदारसंघातील लोकमान्य टिळक (सायन) रुग्णालय असणे, सदर रुग्णालयात संपूर्ण मुंबईमधून विशेषतः धारावी, चुनाभट्टी, प्रतीक्षा नगर, अँटॉपहील सारख्या झोपडपट्टीमध्ये राहणारे गोरगरीब नागरिक उपचारासाठी मोठ्या संख्येने दाखल होत असणे, रुग्णालयाच्या इमारतीचा पुनर्विकास करून सध्याच्या इमारतीचा अद्ययावत इमारत व नवीन अतिरिक्त रुग्णखाटा करिताचा प्रस्ताव मागील कित्येक वर्षांपासून शासनाकडून पारित झालेला असणे, महानगरपालिकेच्या ढिसाळ कार्यपध्दतीमुळे रुग्णालयाचे पुनर्विकासाचे काम मागील कित्येक वर्षांपासून प्रलंबित असणे, यामुळे येथे येणाऱ्या रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, सद्यस्थितीत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या संख्येच्या तुलनेत उपलब्ध रुग्णखाटा, तज्ज्ञ डॉक्टर, नर्स, औषधे, व्हेंटिलेटर व इतर वैद्यकीय उपकरणांची कमी भासणे, यामुळे एका बेड वर एकावेळी दोन किंवा अधिक रूग्णांना उपचार घ्यावा लागत असणे, अशावेळी डॉक्टर किंवा औषधे वेळेवर उपलब्ध न झाल्याने उपचाराअभावी निष्पाप नागरिकांना प्राणाला मुकावे लागल्याची गंभीर बाब निदर्शनास आली असणे, रुग्णालयात रुग्णाकरिता अतिरिक्त खाटा असलेले अद्ययावत रुग्णालयाचे काम करणे गरजेचे असताना मुंबई महानगरपालिकेकडून डॉक्टर व नर्स यांना राहण्याकरिता अद्ययावत वसतिगृह आणि मेडिकल कॉलेजच्या इमारतीचे काम सुरू केल्याची बाब निदर्शनास येणे, यामुळे गरीब व गरजू नागरिकांना उपचारापासून वंचीत रहावे लागत असणे, परिणामी नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला असंतोष, अशा प्रकारे सायन रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या कामात दिरंगाई करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"देवळाली विधानसभा क्षेत्रातील मौजे वासाळी, मोहगांव-बाभळेश्वर, जाखोरी, दुगांव, वाडगांव व नाणेगांव (जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यांवर जलसंपदा विभागाकडून "पाटचारी" नोंदी टाकण्यात आलेल्या असणे, सदर शेतक-यांच्या सातबारा उता-यांवर "पाटचारी" नोंदी टाकताना जलसंपदा विभाग आणि महसूल विभागाने संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता कोणतीही पुर्वसूचना किंवा नोटीस देण्यात आलेली नसणे, तसेच त्याठिकाणी प्रकल्पही उभारण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदरच्या नोंदी रद्द करण्याबाबत शेतकऱ्यांची आग्रही मागणी असणे, त्यासंदर्भात सन्मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांचेसमवेत बैठक घेऊन तशी मागणी करण्यात येणे, परंतु सदरचा निर्णय हा शासनाचा धोरणात्मक निर्णय असल्याने त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेण्यास असमर्थता दर्शविणे, त्यानंतर दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी मा.उपमुख्यमंत्री, (वित्त) यांना पत्र/निवेदन देण्यांत येणे, परंतु अद्याप शासनाकडून त्याबाबत कार्यवाही न होणे, परिणामी, शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण व चिंतेची भावना, त्यामुळे शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील "पाटचारी" म्हणून केलेल्या नोंदी रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"देशातील अंदाजे २४ लाख साध्या यंत्रमागांपैकी ५०% म्हणजे अंदाजे १२ लाखांहून अधिक साधे यंत्रमाग महाराष्ट्रामध्ये असणे, वस्त्रोद्योगातील सर्वाधिक महसूल यंत्रमाग क्षेत्रातून मिळत असणे, या क्षेत्राकडे राज्यसरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष होणे, दिनांक २ जून, २०२३ रोजी जाहीर झालेल्या २०२३ ते २८ या वस्त्रोद्योग धोरणामध्ये राज्यातील साध्या यंत्रमाग क्षेत्राची दखलही न घेणे, माहे जून २०२३ च्या अखेरीस मा.वस्त्रोद्योग मंत्री यांनी धोरणातील दुरुस्त्यांसाठी राज्यातील संघटनांच्या सूचना घेऊनही आजअखेर आलेल्या सूचनांचा कोणताही विचार न होणे, तसेच धोरणात कोणतीही दुरुस्ती न करणे, राज्यातील २७ हॉर्सपॉवर (HP) वरील यंत्रमाग धारकांना ७५ पैसे प्रति युनिट व २७ हॉर्स पॉवरचे खालील यंत्रमागधारकांना रु. १/- प्रति युनिट अतिरिक्त वीजदर सवलत देण्याचा शासन निर्णय दिनांक १५ मार्च २०२४ रोजी जाहीर करणे, परंतु त्यामध्ये यंत्रमाग नोंदणीची जाचक अट लादलेली असणे, त्यामुळे परिणामी एकट्या भिवंडीत २१ हजार यंत्रमागधारक उद्योजकांपैकी केवळ ६० उद्योजकांनी या सवलतीसाठी अर्ज सादर केलेले असणे, नोंदणी अटीमुळे राज्यातील यंत्रमागधारकांना अतिरिक्त सवलत जाहीर होऊनही प्रत्यक्षात न मिळणे, नोंदणी सक्ती योजनेस ०.२ टक्के इतका अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याने योजनेतील नोंदणीची अट रद्द करावी, अशी मागणी सर्व सामान्य यंत्रमागधारक व संघटनांकडून तसेच लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत होत असणे, विदर्भ आणि मराठवाड्यात इलेक्ट्रिसिटी ड्यूटी माफ

असणे, इलेक्ट्रिसिटी ड्यूटी माफीमुळे एकाच राज्यातील यंत्रमागधारकांमध्ये दोन वेगवेगळे दर आणि उद्योगांना घातक अशी स्पर्धा निर्माण होणे, यंत्रमागधारकांसाठी जाहीर केलेल्या स्थिर कर्जावरील ५% व्याजदर सवलतीचा लाभ न मिळणे, सूताची साठेबाजी, काळाबाजार, सतत बदलते दर, व्यापारी वर्गातून वेळोवेळी जाहीर होणारी दिवाळखोरी इ.सर्व कारणांमुळे यंत्रमाग व्यवसाय मागील काही वर्षांमध्ये संकटात असल्याने यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) सर्वश्री. अमित विलासराव देशमुख, बाळासाहेब थोरात, धिरज विलासराव देशमुख, नानाभाऊ पटोले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रत्येक शहराची ओळख ही त्या शहराच्या स्वच्छतेवरुन होत असून याला लातूर शहर अपवाद ठरत असल्याचे निदर्शनास येणे, लातूर महानगरपालिकेच्या गलथान कारभारामुळे शहरात अनेक भागात घाणीचे साम्राज्य निर्माण होणे, लातूर शहरातील मुख्य भागांपैकी शिवनगर, ठाकरे चौक, सूतमिल रोड या नेहमीच्या वर्दळीच्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले असणे, या परिसरात असणारी विविध हॉस्पिटल, शाळा-महाविद्यालय, खासगी क्लासेस, विविध शैक्षणिक साहित्यांची दुकाने, नागरिकांची असणारी सततची ये-जा, या कचऱ्याच्या समस्येमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, जागोजागी कचऱ्याचे ढीग पडल्याने मोकाट जनावरांचा वावर वाढणे, कचऱ्यामुळे गटारी तुंबलेल्या असणे, परिणामी परिसरात दुर्गंधी पसरणे, यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच काही ठिकाणी नाली साफ-सफाई करुन नालीतील कचरा वर काढून नालीच्या कडेला ठेवला जाणे, परंतु हा कचरा कोणीच उचलत नसल्याने दुर्गंधी सुटत असणे, काही दिवसांनी हाच कचरा पुन्हा नालीत पडत असून नाली तुंबत असणे, तसेच नागरिकांकडून ओला व सुका कचरा विलग करुन दिला जात असतानाही घंटागाडीत टाकताना तो एकत्रच टाकला जाणे, त्यामुळे घरात कचरा विलग कशासाठी करायचा? असा प्रश्न नागरिकांकडून केला जाणे, घातक कचऱ्याचे संकलन करणे व त्यावर प्रक्रिया करण्यासंदर्भात सध्या तरी कसलीही यंत्रणा महानगरपालिकेकडे नसणे, त्यामुळे राज्य शासनाने यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रात एकूण ४५ पेठा असणे, त्यापैकी पेठ क्र. १ ते २९ पूर्णतः विकसित असून उर्वरित कमी-अधिक प्रमाणात विकसित असणे, प्राधिकरणाने ९९ वर्षांच्या भाडेपट्टयाने निवासी भूखंड सुमारे ८ हजार ३८९, सदनिका व वाणिज्य गाळे ११ हजार २९३ भूखंडाचे वाटप केले असणे, भूखंड वाटपाचे धोरण, भूखंडाची किंमत, ९९ वर्षांचा भाडेपट्टा, भूखंड हस्तांतरण त्याची कार्यपद्धती व त्यासाठी आकारावयाची अनर्जित रक्कम

(हस्तांतरण शुल्क) आकारणी व कार्यपद्धती इतर बाबी म्हणजे वारस नोंद, कर्जासाठी ना- हरकत दाखला हे भूवाटप नियमावलीतील तरतुदी व विकास प्राधिकरण सभा यांनी केलेले नियम यानुसार करण्यात येणे, दिनांक ७ जून, २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार पि.चिं.न.वि. प्राधिकरण बंद करून त्याचे विलीनीकरण PMRDA व PCMC मध्ये करण्यात आले असून त्या निवासी मिळकती PCMC कडे वर्ग केल्या असणे, परिणामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका अधिकारातील वाटप मिळकतीचे हस्तांतरण, हस्तांतरणाची कार्यपद्धती किचकट व वेळखाऊ असणे, त्यामुळे भूखंड देणार व घेणार यांना मनस्ताप होणे, व्यवहार पूर्ण न होणे, मिळकतीचे मालक असूनदेखील सदर मिळकतीवर कर्ज काढावयाचे झाल्यास ठराविक कारणासाठी PCMC कडून लवकर NOC दिली जात नसणे, त्यामुळे बँकांकडून कर्ज मिळण्यास विलंब होणे, यामुळे सदर मिळकती फ्री होल्ड करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. योगेश कदम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कोकण पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत न्यु-मांडवे प्रकल्प सन १९९४ पासून सुरु होणे, या लघु पाटबंधारे प्रकल्पांची सुमारे २०.४३३ दशलक्ष पाणी साठा साठवून ठेवण्याची क्षमता असून, यामुळे ९९६ हेक्टर क्षेत्र कायमस्वरुपी सिंचनाखाली येणार असल्याने १५ ते २० टंचाईग्रस्त गावांना लाभ मिळणार असणे, सदर प्रकल्पासाठी १ ते ११ कि.मी. कालवा नियोजित करुन १० कि.मी. मधील मुख्य कालव्याचे काम ९० टक्के पूर्ण केले असून, मोठी बांधकामे-४, गाव रस्ता पूल-६ व जलक्षेत्र-३ इ. कामे निधी अभावी प्रलंबित असणे, माहे जानेवारी २०२२ अखेरपर्यंत ४९ कोटी ९६ लाख खर्च आवश्यक असलेल्या १८ नागरी सुविधांपैकी तळे येथील १६ व मांडवे येथील १५ नागरी सुविधांची निविदा निश्चित करुन करण्यात येणे, तर प्रकल्पाच्या उर्वरित नागरी सुविधांसाठी १५५ कोटी ९० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याबाबतचे मान्यतेचे पत्र राज्य तांत्रिक सल्लागार समितीने दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासन स्तरावर सादर केले असून, शासन पत्र क्र. लपायो २०२३/प्र.क्र.१७४/ खारभूमी/२०२४ चे पत्र दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी शासनास सादर केले असणे, मात्र याबाबत अद्याप निधी मंजूर न झाल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) सर्वश्री. हरिभाऊ बागडे, प्रकाश सोळंके, बबनराव यादव (लोणीकर), राजेश टोपे, नारायण कुचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., आदर्श नागरी महिला सहकारी बँकेत सन २०१६ ते २०१९ या काळातील गैरव्यवहार उघडकीस येणे, बिनातारण कॅशक्रेडीट कर्ज वाटप केल्याचे लेखापरिक्षक यांनी फिर्याद करणे, कर्ज देताना तारण घेतलेली मालमत्ता कर्ज

रकमेएवढी नसणे, कर्ज रकमेचा ७/१२ वर बोजा नसणे, कर्ज एकाच्या नावे उचलणे, दुसरे कर्ज नावावर असल्यामुळे धनादेश पत्नीच्या बचत खात्यावर जमा करून रक्कम उचलणे, एकच प्रॉपर्टी मॉर्गेज केलेली असणे, कर्ज प्रकरणांमध्ये नोटरीद्वारे इक्विटेबल मॉर्गेज करणे, रजिस्टर मॉर्गेज नसणे, बँकेत, पतसंस्थेत लोकांच्या ठेवी अडकलेल्या असणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे ४०/४५ लोकांच्या नावे १०० कोटी रुपये कर्ज परस्पर उचलणे, बँकेकडून नोटीस आल्यानंतर आपल्या नावे कर्ज असल्याचे कळणे, त्या कर्जदारांपैकी काही कर्जदार मृत व या बँकेशी कधीच संबंधित नसणे, ज्ञानराधा मल्टीस्टेट को.ऑ.बँक, बीड शाखा करमाड या शाखेच्या खातेदारांचे ४० कोटी पेक्षा जास्त ठेवी बँकेत अडकणे, हे कर्जदार व ठेवीदार व्यक्ती हातगाडी, भाजी विक्रेते, नोकरी, मोलमजुरी करणारे असणे, पतसंस्था, बँकेमध्ये अडकलेल्या ठेवीदारांमध्ये व परस्पर नावे कर्ज उचललेल्या कर्जदारात असंतोष असणे, लोकांचा सहकार क्षेत्रावरील विश्वास कमी होणे, खातेदारांच्या ठेवी परत मिळणेबाबत व कर्जदारांच्या नावावर असलेले कर्ज बेबाकी मिळण्यासाठी असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्री. राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नंदुरबार जिल्हा आदिवासी बहुल असणे, नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती दिनांक १ जुलै, १९९८ रोजी झालेली असणे, मात्र आजही नंदुरबार जिल्ह्यातील जनतेच्या मुख्य समस्या कमी झालेल्या नसणे, जिल्ह्यातील शिकलेली युवा पिढी, तसेच जिल्ह्यातील मोठा वर्ग विशेषत: तरुण युवक रोजगारासाठी स्थलांतरीत होत असणे, नंदुरबार जिल्ह्यातील शहादा व तळोदा तालुक्यात उद्योगधंदे व एमआयडीसी करिता पुरेशी साधनसामग्री, मनुष्यबळ उपलब्ध असणे, मात्र तरीही पंचवीस वर्षात कुठलेही उद्योगधंदे, एमआयडीसी उभारण्यात न आल्यामुळे जिल्ह्यातील युवा पिढीमध्ये उदासीनता दिसून येत असणे, परिणामी जिल्ह्यातील स्थलांतराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असणे, नंदुरबार जिल्हयाची निर्मिती झाल्यापासून शासनाची उद्योगधंदे व एमआयडीसी उभारण्यात कुठलीही ठोस उपाययोजना दिसून न येणे, जिल्ह्याच्या रोजगाराच्या समस्या निवारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : सन २०२४-२०२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (तिसरा व शेवटचा दिवस)**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता (सुधारणा) विधेयक, २०२४

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अस्लम शेख, अमिन पटेल, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, अमित झनक, शिरीष चौधरी व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करते."

**(ख) सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, संजय जगताप, विकास ठाकरे, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, शिरिष चौधरी, डॉ. विश्वजीत कदम व श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**आठ : (बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री आदित्य ठाकरे, सुनिल प्रभू, भास्कर जाधव, विक्रमसिंह सावंत, अनिल देशमुख, जितेश अंतापूरकर, लहु कानडे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री कैलास गोरंटयाल, रविंद्र धंगेकर, अस्लम शेख, हिरामण खोसकर, ॲड. के.सी.पाडवी, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री झिशान सिद्दीकी, कुणाल पाटील, अमीन पटेल, शिरीष चौधरी, संग्राम थोपटे, राजेश एकडे, राजन साळवी, धीरज देशमुख, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री वैभव नाईक, अमित देशमुख, रणजित कांबळे, अमित झनक, ऋतुराज पाटील, विकास ठाकरे, शिरीषकुमार नाईक, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री सुभाष धोटे, राजू आवळे, माधवराव जवळगावकर-पाटील, संजय जगताप, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, सहसराम कोरोटे, बाळासाहेब पाटील, विनोद निकोले, संदिप क्षीरसागर, राजेश टोपे, प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतकऱ्यांबद्दल शासन उदासीन असून शासनाची ध्येयधोरणे त्यांना उध्वस्त करण्याचे काम करीत असणे, सततची नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा अशा संकटांमुळे शेतकरी मेटाकुटीस येणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढणे, मात्र या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे सोईस्कर दुर्लक्ष होणे, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक कुचंबणा, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा हवेत विरणे, दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यातील परिस्थिती गंभीर होणे, गतवर्षीची मदत अत्यंत तुटपुंजी असून अद्यापही बऱ्याच संख्येने शेतकरी या मदतीपासून वंचित राहणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरीमुळे पीक विमा योजनेचा बोजवारा उडाला असून याकडे शासनाचे सोईस्कर होत असलेले दुर्लक्ष, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई तर दुसरीकडे टँकर माफीयांची लुटालूट याने सामान्य नागरिक हवालदिल झाला असणे, पाण्यासाठी शेतकरी टाहो फोडत असताना शासन त्याबाबत संवेदनशील नसणे, दुष्काळ व पाण्याची

भीषण टंचाई निवारण्याबाबत करण्यात आलेल्या अपुऱ्या उपाययोजना, "हर घर नल का जल" योजनेद्वारे कोट्यवधी रुपये खर्चुनही महिलांच्या डोक्यावर हंडा कायम असल्याने शासनाची फसवी ठरलेली "गॅरंटी", चारा छावण्या उभारण्याबाबत शासनाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी पशुधनाचे हाल होऊन शेतकरी अडचणीत आलेला असणे, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी होरपळत असताना शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीबाबत शासनाची असलेली अनास्था, माहे जानेवारी ते मे, २०२४ या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवरील अन्याय कायम असणे, कोकणातील शेतकऱ्यांकडे सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान न मिळणे यामुळे लाखांच्या पोशिंद्याला शासनाच्या नाकर्तेपणामुळे हात पसरण्याची वेळ आलेली असणे, तसेच गेल्या दोन वर्षात शासनाच्या विविध विभागांमध्ये उघडकीस आलेल्या भ्रष्टाचाराची व गैरव्यवहाराची शासनाकडून गांभीर्याने दखल घेतली न जाणे, स्मार्ट प्रीपेड मीटर योजना ही काही विशिष्ट उद्योगसमूहाला फायदा पोहोचविणारी असल्याने या योजनेबाबत जनतेत पसरलेला असंतोष, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास व शालेय शिक्षण विभागात गणवेश व इतर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत झालेला गैरप्रकार, ज्येष्ठता डावलून पदस्थापना, औषध तसेच रुग्णवाहिका खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा घोटाळा, कामगार विभागात व बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला घोटाळा, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार, फसलेले वाळू धोरण व वाळू माफियांचा हैदोस त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमिनीच्या खरेदीत केलेला गैरव्यवहार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामध्ये वाढत असलेल्या भ्रष्टाचारास शासनाचा पाठींबा असणे, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे अखर्चित राहणे, या सर्व प्रश्नांबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**नऊ : (बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, दिलीपराव बनकर, ॲड. राहुल कुल, श्री. संजय शिरसाट,**

**डॉ. संजय कुटे, श्री. नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, ॲड. आशिष शेलार, श्री. प्रकाश आबिटकर, श्रीमती सरोज अहिरे, श्री.बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री दत्तात्रय भरणे, संतोष दानवे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, रत्नाकर गुट्टे, नारायण कुचे, चिमणराव पाटील, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, सदानंद सरवणकर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री रमेश बोरनारे, शांताराम मोरे, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, ज्ञानराज चौगुले, हरिभाऊ बागडे, चंद्रकांत निंबा पाटील, श्रीमती लताबाई सोनावणे, सर्वश्री प्रकाश सुर्वे, बच्चू कडू, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री जयकुमार गोरे, दिलीप लांडे, श्रीमती गिता जैन, सर्वश्री भिमराव तापकीर, योगेश कदम, बालाजी कल्याणकर, डॉ. राहूल आहेर, श्री. महेंद्र दळवी, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, श्रीनिवास वनगा, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड.लक्ष्मण पवार, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री चेतन तुपे, यशवंत माने, दिपक चव्हाण, राम सातपुते, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री विजयकुमार देशमुख, कालीदास कोळंबकर, किशोर पाटील, ॲड.राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री हरिष पिंपळे, प्रकाश भारसाकळे, सुरेश भोळे, मंगेश कुडाळकर, डॉ. पंकज भोयर, ॲड. आशिष जैस्वाल, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. किशोर जोरगेवार, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, समाधान अवताडे, योगेश सागर, किसन कथोरे, संजय केळकर, गणेश नाईक, महेंद्र थोरवे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री अतुल भातखळकर, संतोष बांगर, श्रीमती अश्विनी जगताप, सर्वश्री शेखर निकम, प्रशांत बंब, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, मंगेश चव्हाण, नामदेव ससाणे, डॉ. देवराव होळी, सर्वश्री समीर कुणावार, दादाराव केचे, राजेश पाटील, विनोद अग्रवाल, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, प्रकाश सोळंके, प्रकाश आवाडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे कल्याण हे एकमेव ध्येय समोर ठेवून व नारी शक्ती आणि युवा शक्तीला प्राधान्य देऊन 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्र गतीमान ठेवण्याचा, जनकल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, राज्यात एकीकडे दुष्काळाची होरपळ तर दुसरीकडे वादळी पाऊस, गारपीटीचा कहर सुरु असणे, खरेतर उन्हाळी तसेच रब्बी आणि खरीप अशा तिन्ही हंगामांवर नैसर्गिक आपत्तींनी घाला घातला असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शेत पिकांचे खुप नुकसान झाले असल्याची वस्तुस्थिती असणे, राज्यात कमी पाऊस असलेल्या आणि जनावरांचा चा-याचा प्रश्न निर्माण झालेल्या राज्यातील १२४५ महसुली मंडळात चारा

छावण्या उभारण्यास शासनाने परवानगी दिली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, स्वर्गीय वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशनला मजबुत करुन शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी टास्क फोर्सला बळकट करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीनसाठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा ६ लाख शेतक-यांना लाभ मिळू शकेल अशी तरतूद करण्यात येणे, शेतक-यांकरिता 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजना राबविण्यासाठी ५ हजार ७०० कोटींची तरतूद करुन त्याचा पहिला हप्ता शेतक-यांच्या बँक खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास येणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई- पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी 'मागेल त्याला सौरऊर्जा पंप' उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, केवळ १ रुपयात पिक विमा योजना राबविण्यात येत असल्याने खरीप हंगामासाठी राज्यातील १ कोटी ७० लाख व रब्बी हंगामासाठी ६६ लाख अशा एकूण २ कोटी ३६ लाख शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत विक्रमी सहभाग नोंदविला असल्याचे निदर्शनास येणे, शेतक-यांना दिलासा देण्याकरिता एनडीआरएफच्या दराच्या दुप्पट दराने शेतक-यांना मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाकरिता ७,१९६ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला असणे, कमी पाऊस झालेल्या राज्यातील १,०२१ महसूल मंडळात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात येऊन तेथील शेतकऱ्यांना कर्जाचे पुनर्गठन, चालू वीज बिलात ३३.५ टक्के सूट यासारख्या विविध ८ सवलती लागू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास येणे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत पहिल्या टप्प्यात ४ हजार कोटी रुपयांचा निधी वाढवून आता ५४६९ कोटी एवढा करण्यात आला असणे, राज्यात प्रथमच कांदा महा बँक हा पथदर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला असणे, विदर्भातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, बुलढाणा येथे आधुनिक संत्र प्रक्रिया केंद्रे उभारण्याकरिता सुमारे २० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतील २१२९ लाभार्थ्यांना ७ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी दिला असल्याचे निदर्शनास येणे, 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा विस्तार करून मागेल त्याला फळबाग, मागेल त्याला ठिंबक व तुषार सिंचन, मागेल त्याला शेततळ्याचे अस्तरीकरण, मागेल त्याला आधुनिक यंत्रे, कॉटन श्रेडर इ. देण्याचा निर्णय करुन त्याकरिता १ हजार कोटी यावर्षी खर्च करण्याचा शासनाचा मानस असणे, पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतकरी वर्गाचा आर्थिक आधार बळकट करण्याकरिता मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राज्यात कार्यान्वित केला असणे, त्यायोगे राज्यातील लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्यसाखळी विकसित करणे हा या प्रकल्पाचा उद्देश असणे, कृषी, शिक्षण, संशोधन आणि विद्यापीठांची संरचना आणि कार्यपध्दती अभ्यास करण्यासाठी माजी कुलगुरु डॉ. राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असणे, राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे प्रस्तावित असून त्यायोगे २ वर्षांत ६१ सिंचन प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित असणे,

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित केल्याने नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्हयातील सुमारे ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणे, जलयुक्त शिवार अभियानांकरिता ६०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असणे, स्वच्छ व हरित ऊर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-सिरसाई, पुरंदर यासह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनाचे सौर उर्जीकरण करण्यात येत असून त्याकरिता ४ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, म्हैसाळ, जि. सांगली येथे पथदर्शी सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात आल्याने सांगली आणि सोलापूर जिल्हयातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबियांना याचा लाभ मिळाला असणे, कोल्हापूर आणि सांगली जिल्हयातील पुरामुळे होणारी जिवित व वित्तहानी टाळण्याकरिता आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्याकरिता जागतिक बँकेच्या सहाय्याने ३ हजार २०० कोटी रुपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यात येणे, राज्यात गरजू महिलांना ओळखण्यासाठी व त्यांना सक्षम करण्यासाठी ‘नारी शक्ती दुत ॲप’ हे एक क्रांतिकारी ॲप्लीकेशन राबविण्यात येत असणे, राज्यातील महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन आणि उद्योजकता विकासासाठी सक्षम करण्याकरिता ‘पंतप्रधान नमो महिला सशक्तीकरण अभियान’ राबविण्यात येत असणे, ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना’ राबविण्यात येऊन त्यायोगे २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, ‘शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह’ योजनेत लाभार्थी मुलांना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरुन २५ हजार रुपये करण्यात येणे, ‘मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना’ या माध्यमातून पात्र कुटुंबाला वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचे घोषित करण्यात आले असणे, महिला बचत गटानी उत्पादित केलेल्या वस्तूंना ‘उमेद मार्ट’ आणि ‘ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म’ याद्वारे यावर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचा उद्देश शासनाने ठेवला असणे, सन २०२४-२५या शैक्षणिक वर्षापासून मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, प्रतिवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ राबविण्यात येत असणे, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड, अवसरी खुर्द, जि. पुणे येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्यात येणार असणे, राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत इ. संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यात आले असून त्यायोगे ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या असणे, महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर 'इंडिया जॅम्स ॲन्ड ज्वेलरी पार्क' उभारुन त्यायोगे १ लाख रोजगार निर्मिती करण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, सिंधुदुर्ग जिल्हयात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हिंग केंद्र उभारण्याकरिता २० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली असणे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्याच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च

दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मू काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, शिवछत्रपतींचा पूर्णाकृती पुतळा राज्याच्या सीमेवर बांधणे, शिवछत्रपतींची वाघनखे राज्यात आणणे, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेमध्ये समाविष्ठ १४० चाचण्यांमध्ये वाढ करणे तसेच, आपला दवाखाना योजनेची व्याप्ती वाढवून ती मुंबईबाहेरही राज्यभर करण्याची आवश्यकता, विकसित महाराष्ट्राचा ध्यास घेऊन राज्यात शेतकरी, शेतमजूर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी व लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, सुरेश वरपुडकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, राजन साळवी, डॉ.नितीन राऊत, श्री.अमीन पटेल, अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.अमित देशमुख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संग्राम थोपटे, रमेश कोरगावकर, प्रकाश फातर्पेकर, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री सुनिल भुसारा, अस्लम शेख, राजेश टोपे, संजय जगताप, प्राजक्त तनपुरे, अॅड. के.सी.पाडवी, सर्वश्री अनिल देशमुख, कुणाल पाटील, बाळासाहेब पाटील, शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, शिरीष चौधरी, अमित झनक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, सुभाष धोटे, रणजित कांबळे, मोहनराव हंबर्डे, कैलास गोरंटयाल, जितेश अंतापूरकर, रविंद्र धंगेकर, विक्रमसिंह सावंत, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री राजू आवळे, हिरामण खोसकर, झिशान सिद्दीकी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील कमालीची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, बलात्कार, अपहरण, दरोडे, घरफोड्या, भ्रष्टाचार यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात शासनाला आलेले अपयश, गुन्हेगारांवर वचक बसण्याऐवजी त्यांचे वाढलेले मनोधैर्य, महिलांवरील लैंगिक अत्याचारात झालेली वाढ, नागपूर शहरातून तीन वर्षात सुमारे ११९५ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने उपराजधानीतील पालकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, पुण्यात वाढत असलेले ड्रग्ज, पब, अवैध बार याकडे गृह तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे तरुणांमध्ये वाढत असलेली व्यसनाधिनता व गुन्हेगारी, पुणे शहरात कोयता गँग व इतर गुन्हेगारीने उच्छाद मांडला असून कल्याणीनगर हिट अँड रन प्रकरणानंतर शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, पुण्याच्या हिट अँड रन प्रकरणी पोलिसांची व ससून रुग्णालय प्रशासनाची संशयास्पद भूमिका, आरोपी बिल्डर पुत्राला वाचविण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी रक्त नमून्यामध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यातील बारसेवाडा येथे जादूटोणा केल्याच्या संशयातून एका पुरूषासह महिलेस जिवंत जाळून ठार केल्याची घडलेली धक्कादायक

घटना, कोपर्डी येथे मागासवर्गीय तरुणाला जातिवाचक शिवीगाळ करुन नंतर नग्न करुन मारहाण केल्याने संबंधित तरुणाने केलेली आत्महत्या, राज्यात वकिलांवर होत असलेले प्राणघातक हल्ले, राहुरी येथील पाच लाखांच्या खंडणीसाठी आरोपींनी वकील दाम्पत्याचे अपहरण करुन केलेल्या हत्येमुळे राज्यात कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, कायद्याचा वचक न राहिल्याने विद्यमान लोकप्रतिनिधींनी पोलीस ठाण्यात केलेला गोळीबार व दहिसर येथे माजी नगरसेवकाची करण्यात आलेल्या हत्येचा तपास अद्यापही पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, इंदापूरचे तहसिलदार व रत्नागिरीचे उपजिल्हाधिकारी यांच्यावर वाळू माफियांकडून झालेला भ्याड हल्ला, एका महिला पत्रकाराने राजकीय पक्षाच्या उमेदवाराबाबत बातमी छापल्याने गुंडांनी त्यांना धमकविल्याचा निदर्शनास आलेला निंदनीय प्रकार, मराठा आंदोलकांवर आंदोलन मागे घेण्यात येऊन असंख्य गुन्हे दाखल करण्यात येणे, जालन्यात एका कुटुंबावर हल्ला करून त्यांचे घर पाडल्याचा उघडकीस आलेला प्रकार, मिरा-रोड येथील लोकप्रतिनिधींनी पालिकेच्या कनिष्ठ अभियंत्यास केलेली मारहाण, हिंगोलीच्या लोकप्रतिनिधींनी महावितरण कर्मचाऱ्यास फोनद्वारे दिलेली धमकी, यामुळे प्रशासनाचे मनोधैर्य खच्चीकरण होत असल्याने जनसामान्यात शासनाविषयी पसरत असलेली असुरक्षिततेची भावना, राज्यातील पोलिसांच्या अंतर्गत समस्यांचे निवारण न होणे, वीस-बावीस तास काम करणारे पोलिस कर्मचारी, त्यांच्या निवासाचे प्रश्न, मानसिक आरोग्य आणि मानसिक आरोग्याअभावी निर्माण होणारे अन्य प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, गुटखा, विदेशी सिगारेट, ई-सिगारेट व तत्सम बंदी असलेल्या पदार्थांची बेकायदेशीररित्या ठिकठिकाणी सुरू असलेली विक्री, राज्यातील नगरपालिका/महानगरपालिकांमध्ये वाढत चाललेला भ्रष्टाचार, मुंबई महानगरपालिका, MSRDC आणि MMRDA मध्ये प्रकल्पाच्या किंमतीमध्ये केलेली छुपी वाढ, फुगविलेले अंदाजपत्रक व केलेला भ्रष्टाचार, सिडकोमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, कौशल्य विकास व उद्योजकता विभागामध्ये सुरु असलेले घोटाळे, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचार, सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सुरु असलेले गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचा उद्रेक, अन्न व औषध प्रशासनामधील भ्रष्टाचार, अटल सेतूच्या कामातील अनियमितता, झोपडपट्ट्यांमधील स्वच्छतेच्या निविदेत कोट्यवधी रुपयांची अनियमितता, नाशिकच्या देवळाली शिवारातील टीडीआर घोटाळा, मुंबई महानगरपालिकेत वाढत असलेला भ्रष्टाचार, नगरविकास विभागांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त निधी अखर्चित राहणे, राज्यात औद्योगिक क्षेत्रांमधील कारखान्यांमध्ये सुरु असलेली स्फोटांची मालिका व त्यामुळे मोठ्या प्रमाणात झालेली वित्त व जीवितहानी, रासायनिक कंपन्यांमधून रसायनयुक्त पाणी प्रक्रिया न करताच नद्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे होणारे जलप्रदूषण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. अमिन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईमध्ये नामांकित रूग्णालयामधील एक रुग्णालय सर जे.जे. ग्रुप रुग्णालय असणे, या रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असणे, या रुग्णालयात औषधांचा तुटवडा असणे, सि.टी. स्कॅन मशीन व एम.आर.आय मशीन बंद असणे, रुग्णांना औषधे बाहेरून घेण्यासाठी भर दिला जाणे, बहुतांश वैद्यकीय चाचण्या बाहेरून करून घेतल्या जाणे, ऑपरेशन थियेटर मागील काही काळापासून बंद असल्याची बाब निदर्शनास येणे, रुग्णालयात सी. टी. स्कॅन करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या तारखा देण्यात येणे, त्यामुळे रुग्णांवर वेळेत उपचार न होणे, महानगरपलिकेच्या नायर रुग्णालयात देखील रुग्णांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, जी. टी. रुग्णालय येथे देखील औषधांचा तुटवडा निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त असणे, परिणामी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) ॲड. पराग अळवणी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरासह राज्यात अंमली पदार्थाच्या तस्करी आणि विक्रीत वाढ झाल्याचे मुंबई पोलिसांच्या आकडेवारीनुसार समोर आलेले असणे, आकडेवारीनुसार मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गेल्या आठ महिन्यात ९१७ प्रकरणात सुमारे ४६ कोटींचे अंमली पदार्थ जप्त केलेले असणे, यात सर्वात जास्त एमडी अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून, याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत २८ कोटी एवढी किंमत असणे, अंमली पदार्थांचे व्यसन पूर्वी उच्चभ्रू वस्तीतील लोकांपर्यंत मर्यादित होते. मात्र आता अंमली पदार्थ सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेले असून परिणामी अंमली पदार्थांच्या विळख्यात मोठमोठ्या आयटी कंपन्यामध्ये किंवा कॉर्पोरेट कंपन्यांमधील कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते शाळकरी मुलेसुद्धा येणे, काही प्रकरणात अंमली पदार्थांचा वापर शारीरिक आणि लैंगिक क्षमता वाढविण्यासाठी देखील केला जात असल्यामुळे तरुणांमध्ये अंमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढलेले असणे, काही पबमध्ये अंमली पदार्थाची विक्री करण्यात येत असून तरुण तरुणींना ड्रग्सचे व्यसन लावले जात असणे, त्यानंतर तरुणींचा वापर ड्रग्स तस्करी आणि देहव्यापारासाठी करण्यात येत असल्याची काही प्रकरणे समोर आलेली असणे, शहरातील तरुणांप्रमाणेच आता राज्यातील छोट्या छोट्या गावांमध्येही तरुण मुले व्यसनाच्या आहारी जाणे, त्यामुळे राज्यातील वाढत्या अंमली पदार्थ विक्रीवर शासनाने लवकरात लवकर ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ३ जुलै, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा